गोमंतक साहित्य सेवक मंडळाचे

# रौप्यमहोत्सवी गोमंतक मराठी साहित्य संमेलन

बा. द. सातोस्कर नगर,
औद्योगिक विकास महामंडळ मैदान,
पाटो, पणजी-गोवा.

## २४ व २५ जानेवारी २००४

# रजतरसाचे चांदणे

संपादक

**नारायण महाल**

# लक्ष्मणरावांच्या कथेतील नवकथेची प्रसादचिन्हे

- डॉ. बाळकृष्ण कानोळकर

प्रा. लक्ष्मणराव सरदेसाईंनी १९२९ ते १९८६ पर्यंत अखंडपणे कथालेखन केलेले असले तरी त्यांना मराठी समीक्षाव्यवहारात ओळखले जाते ते पहिल्या पिढीचे कथाकार म्हणून. ही पहिली पिढी नवकथेच्या उदयाने समाप्त होते. नवकथेचा उदय सर्वसाधारणपणे १९४५ च्या आगेमागे झाला हे सर्वांविदित आहे. प्रा. सरदेसाईंनी नवकथेच्या उदयापर्यंत शेकडो कथा लिहिल्या. आणि तोपर्यंत त्यांच्या निवडक कथांचे ५ संग्रह प्रसिद्ध झालेले होते. या कालखंडातले ते एक महत्त्वाचे कथाकार मानले गेले आहेत.

प्रा. सरदेसाईंच्या कथेचे स्वरूप पहात असताना आपण पाहिले आहे की त्यांनी लिहिलेल्या कथांमध्ये आशय आणि अभिव्यक्ती अंगाने पाहता वैचित्र्य आणि वैविध्य आढळून येते. यातून त्यांची प्रयोगशीलता सिद्ध होते. या कालखंडात (१९४५ पर्यंत) संग्रहबद्ध झालेल्या त्यांच्या निवडक कथांची संख्या ६५ भरते. त्यांत एकूण १३ कथा अशा आहेत की त्या वेंगळा आणि विशेष अभ्यास करायला अभ्यासकाला प्रेरित करतात. त्यांच्या प्रकाशित संख्येच्या एकपंचमांश इतकी मोठी ही संख्या आहे.) या कथांतून युगप्रवृत्तीच्या मर्यादांचे उल्लंघन करण्याच्या प्रवृत्तीचा संकेत मिळतो. यालाच प्रा. सरदेसाईंच्या कथालेखनातील नवकथेची प्रसादचिन्हे म्हणता येईल. कारण या कथा तत्कालीन कथांच्या तुलनेत विचार करता काहीशा नव्या असल्याचे आणि आपले नाते ती पुढील काळातल्या नवकथेशी जोडू पहात असल्याचे जाणवते. अशा प्रकारच्या ज्या कथा त्यांच्या लेखणीतून उतरल्या त्या पुढील प्रमाणे सांगता येतील:- 'नवे वर्ष', 'कौमार्याचे बंध', 'सहनशील' व 'हृदयाचे समाधान' (कल्पवृक्षांच्या छायेत), 'जीवनाधार', 'वैर', 'हूरहूर' व पिंपळाचे हृद्‌गत' (सागराच्या लाटा), 'मृगजल', 'तिचा उद्धार' (वादळातील नौका), 'मायेचा वारसा', 'भाग्यवंत' व 'मेणाची बाहुली' (ढासळलेले बुरूज) आणि 'अपूर्णतेतील सुख' (आनीतेचे दिव्य).

उपरोक्त कथांतून नवकथेची कोणती वैशिष्ट्ये आढळून येतात हे पाहण्यापूर्वी नवकथेच्या संदर्भात समीक्षकांनी काय म्हटले आहे ते पाहणे आवश्यक आहे:

१) नवकथेचे प्रणेते प्रा. गंगाधर गाडगीळ म्हणतात, ''सर्वसामान्यपणे या नव्या लघुकथेची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. या लघुकथेत जीवनाचे अधिक वास्तव, सूक्ष्म आणि विविध पातळ्यांवरून व भूमिकांवरून घडणारे दर्शन आढळून येते. मनुष्याच्या मनोव्यापाराचे दर्शन या कथेनेच मराठी वाचकांना घडवले. व्यक्तिजीवन आणि समाजजीवन यांच्या अनेकविध संबंधांचे दर्शन या लघुकथेत पहिल्यांदाच आढळून येते. कथानकाच्या साच्यामधून आता लघुकथा मोकळी झाली आहे.... वस्तुनिष्ठ वर्णनपद्धतीबरोबरच अनुभवनिष्ठ वर्णनपद्धतीचा उपयोग नव्या लघुकथेत परिणामकारकपणे करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे अर्थव्यक्तीच्या काव्यात्मक पद्धती या लघुकथेत वापरलेल्या आढळून येतात.''

२) डॉ. भालचंद्र फडके- नवकथेच्या कालखंडाविषयी ते लिहितात:
''महायुद्धानंतर मराठी साहित्यात- विशेषत: कविता आणि कथा या क्षेत्रात- नव्या जाणिवेचा उदय झाला. व्यक्तीचे बाह्यविश्व आणि अंतर्विश्व यांमध्ये एक अपरिहार्य नाते आहे आणि तिचे अनुभवविश्व स्वयंपूर्ण आहे ही फार महत्त्वाची जाणीव होय.''

३) प्रा. आनंद यादव- उपरोक्त नवजाणिवेसंबंधाने ते लिहितात की,
''तरूणांची मने आता देशाभिमान, देशभक्ती, सामाजिक सुधारणा, जीवनासाठी साहित्य आदी गोष्टीपासून मुक्त होती. वाङ्‌मयीन क्षेत्रातही बा. सी. मर्ढेकरांनी 'आत्मनिष्ठा' म्हणजे काय ते अचूकपणे

सांगितले होते. .... ललित साहित्यात भाषा केवळ निवेदनाची बाब न मानता आविष्काराची बाब मानली गेली.''

४) डॉ. इंदुमती शेवडे यांनी नवकथेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे नोंदविली आहे:

१. पहिली गोष्ट म्हणजे तिच्यातील वास्तवता (रियालिझम). तिच्या लेखकाचा वास्तववादी दृष्टिकोन.

२. मानवी मन ही अत्यंत गुंतागुंतीची गोष्ट आहे याची जाणीव या कथेला प्रथम झाली.

३. नवकथेने बहिरंगही बदलले.

४. ही भाषा वर्णनात्मक नाही तर संस्कारात्मक आहे.

५. नवकथेत स्थूल गोचर वास्तवापेक्षा 'मानसिक' जाणीव-नेणिवेतील वास्तवाला प्रमुख स्थान आहे.''

५) डॉ. अंजली सोमण- नवकथेने मराठी कथेत केलेले बदल नोंदविताना त्यांनी नवकथेची वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत ती अशी:-

१. प्रस्तापित तंत्रवादाला आणि कथेबद्दलच्या भ्रामक कल्पनांनाविरोध केला.

२. कथानकाचे बंधन नाकारले.

३. घाटाची अनेक रूपे दाखवली.

४. पात्रचित्रणातील साचेबंदपणा अमान्य केला.

५. मनोविश्लेषणाचे महत्त्व सिद्ध केले.

६. साहित्य व जीवन यांच्यात संबंध जुळवून आणला.

७. जीवनाविषयीची अधिक सूक्ष्म आणि प्रगल्भ जाणीव दिली.''

६) अरविंद गोखले यांनी वेगळ्या पद्धतीने नवकथेची वैशिष्ट्ये नोंदविताना म्हटले आहे की,

''सोय म्हणून नवकथा हा शब्द आला असं मला वाटतं... त्या लेखनाचा स्वभाव वेगळा होता. सूचकता, संयम व सूक्ष्मता त्यात होती. ती अंतर्मुख कथा होती. तिला विषयाचं, तंत्राचा बंधन नव्हतं. परिणाम साधायची हाव तिला नव्हती.... पण नवकथा म्हणजे अगदी कोरडेपणानं लिहिणं हीच व्याख्या असेल तर त्यात आम्ही कुणीच (गाडगीळ, भावे, गोखले, माडगूळकर) बसत नाही हे खरं आहे.''

७) डॉ. सुधा जोशी- यानी नवकथेचा काळ व नवकथेची वैशिष्ट्ये याविषयी म्हटलेले आहे की,

''नवकथा व नवकाव्य या विशिष्ट संज्ञा त्या काळात नव्याचे घडल्या. त्यातील 'नव' हे विशेषण कालसापेक्षात सूचित करणारे नव्हे तर मूल्यवाचक होते.''

वर नोंदविलेली नवकथेविषयीची मते ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहे. त्यात समीक्षकाच्या बरोबरीनेच प्रत्यक्ष अग्रणी नवकथाकारांच्या मतांचाही समावेश आहे. याशिवाय प्रा. म. ना. अदवंत आदी इतर अनेकांनी नवकथेच्या संदर्भात आपली मते नोंदविलेली आहेत. परंतु अभ्यासाच्या दृष्टीने उपरोक्त मते पुरेशी आहेत असे वाटते. त्यांवरून नवकथेच्या स्वरूपाविषयी पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतील:-

१. नवकथा हा एक कथावाङ्मयातली नवी प्रवृत्ती आहे.

२. नवतेचे तत्त्व कालसापेक्षता सूचित करणारे नसून मूल्यवाचक आहे.

३. ही कथा अनेकविध वाङ्मयबाह्य प्रयोजनांपासून मुक्त आहे.

४. ही कथा वास्तववादी असून तिच्यातील लेखकाचा वास्तववादी दृष्टिकोन वेगळा आहे.

५. ही कथा खऱ्याखुऱ्या अर्थाने वास्तवाकडे डोळसपणे पाहते आणि समाजजीवनातील विविध स्तरांवरील वास्तवाचे आकलन प्रकट करते.

६. तात स्थूल गोचर वास्तवापेक्षा 'मानसिक' जाणीव-नेणिवेतील वास्तवाला प्रमुख स्थान आहे.

७. ही कथा जीवनाचा अधिक सखोलपणे आणि चिंतनशील वृत्तीने शोध घेते.

८. कथानकाचे व तंत्राचे बंधन आणि पात्रचित्रणातला साचेबंदपणा तिने नाकारला.
९. कथेच्या अंतर्घाटाबरोबरच बहिर्घाटातही तिने बदल घडवून आणला.
१०. मनोविश्लेषणाचे महत्त्व सिद्ध करून अंतर्मनातील गूढ व्यवहाराचे आकलन संज्ञाप्रवाहात्मक पद्धतीने केले.
११. तिची भाषा वर्णनात्मक नसून संस्कारात्मक आहे. तिने आशय आणि भाषा यांच्या अभिन्नत्वाचे महत्त्व सिद्ध केले.

नवकथे संबंधीच्या उपरोक्त विवेचनाच्या प्रकाशात प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई याच्या उपरोक्त १३ कथांचा विशेष अभ्यास विस्ताराने करण्यासारखा आहे. या कथांसंबंधाने याच प्रकरणातून तदनुषंगिक विवेचन इतरत्र आलेले आहे. तेव्हा त्याची पुनरावृत्ती टाळून अगदी संक्षेपाने सूत्रबद्धपणे त्यातील 'नव' सूचकता पुढे नोंदवीत आहे:- (कंसातला आकडा लेखन दिनांक सूचवतो.)

१) जीवनाधार: (०४-४-१९३१): या कथेतून प्रा. सरदेसाईने मनोविश्लेषणाच्या आधारे काम प्रेरणेचा शोध घेण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. पुढे याच जात कुळीतली कथा 'सतरावे वर्ष' पु. भा. भावे यांनी १९४६ साली लिहिली. दोन्ही कथांचा तौलनिक अभ्यास केल्यास प्रा. सरदेसाईंचे अशा प्रकारच्या कथालेखनातले प्रवर्तकत्व सहज सिद्ध होऊ शकेल. मनोविश्लेषणाचा समर्थ आविष्कार घडविणारी त्यांची ही कथा. संज्ञाप्रवाही तंत्राचा माफक प्रयोग केल्याचे त्यात दिसून येते. किशोरावस्था आणि कुमारावस्था यांच्या सीमारेषेवरच्या राघूच्या मनातील स्त्री दर्शनाने निर्माण झालेली. आंदोलने टिपण्याच्या यशस्वी प्रयत्न लेखकाने या कथेत केला आहे.

२) हूरहूर: (०५-६-१९३१): तारूण्याला स्वाभाविक अशी स्त्रीविषयक अभिलाषा पूर्ण न झाली तर केव्हा केव्हा विवेकी तरूण मन कसे दोलायमान होते याचे चित्र.. या गोष्टीत दिसेल.'' या शब्दात प्रा. रा. भि. जोशी यानी या कथेतील मनोविश्लेषणाची दखल घेतलेली आहे. या कथेमधील पुरूष प्रौढ आहे. कामप्रेरणेच्या पार्श्वभूमीवर लेखक या कथेतील निवेदकाच्या मनाचे दर्शन घडवितो.

३) तिचा उद्धार: (मार्च १९३२): या कथेतूनही वरील कथाप्रमाणेच कामप्रेरणेच्या संदर्भात पाद्री मेंदोस आणि विवाहित स्त्री लुईजा यांच्या मनातील सूक्ष्म आंदोलने हळुवारपणे टिपण्याचा प्रयत्न केलेला आहे.

४) सहनशील: (१०-७-१९३२): या कथेतून जाईच्या दरिद्री संसाराचे वास्तवदर्शन समर्थपणे घडविण्यात प्रा. सरदेसाई कमालीचे यशस्वी ठरले आहेत. समाजजीवनातील विविध स्तारंवरील वास्तवाचे आकलन करण्याचा लेखकाचा प्रयत्न तिच्यातून जसा दिसून येतो तसाच वास्तव चित्रणातला अभूतपूर्व असा रंजनवाद, निरपेक्ष असा त्यांचा नवा दृष्टिकोन या कथेतून प्रभावीपणे जाणवतो.

५) हृदयाचे समाधान: (२०-१०-३२): या कथेला रूढ असे कथानक नाही. एक उच्चवर्णीय सुखवस्तू ख्रिस्ती कुटुंबाचे शब्दचित्र त्यातून प्रा. सरदेसाईंनी रंगविलेले आहे. असे असूनही कथा परिणामकारकतेत कुठेच उणी पडत नाही.

६) कौमार्याचे बंध: (२१-२-१९३३): प्रा. लक्ष्मणराव सरदेसाईंची खळबळ माजवून देणारी अशी ही कथा. तत्कालीन समाजधुरिणची तिने झोपमोड केलेली होती. या कथेमधूनही पौगंडावस्थेतील गजरेच्या मनात चंद्राच्या सहवासात पडलेली कामप्रेरणेची ठिणगी आणि त्याच्या परिणामस्वरूप तिच्या मनात घडून आलेली क्रांती याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न लेखकाने समर्थपणे केलेला आहे. याही कथेच्या वाचनाने पु. भा. भावेच्या उपरोक्त 'सतरावे वर्ष' या कथेचे स्मरण व्यासंगी वाचकाला झाल्याविना रहाणार नाही. या कथेतील मनोविश्लेषण सूचकतेच्या पातळीवरचे आहे.

७) वैर: (२१-५-१९३३): या कथेतून प्रा. सरदेसाई बालमानसशास्त्राचा आविष्कार मराठी कथेत घडवून आणतात. अशाच प्रकारचा प्रयत्न त्यांनी आपल्या 'स्वर्गात' या कथेतून केलेला आहे. परंतु ती कथा

घटनाबाह्य झालेली असल्याने तिच्यामधील मनोविश्लेषण झाकोळले गेले आहे. 'वैर' म्हणजे काय? हा प्रश्न पडलेल्या लहान मुलाच्या निष्पाप मनाचे चित्रण या कथेतून करण्यात आलेले आहे.

८) नवे वर्ष: (०२-११-१९३३): या कथेतून गरीब पोस्टमन, आंतोनियुच्या मनाची चाललेली चलबिचल उत्कृष्टपणे चित्रित केलेली आहे. नववर्षाच्या सणाच्या पार्श्वभूमीवर एका कुटुंबवत्सल गरीब माणसाच्या संसाराचे करूण चित्र त्यातून चित्रित केलेले आहे. परंतु त्या कारूण्याच्या पार्श्वभूमीवर लेखकाने पोस्टमन आंतोनियो यांच्या मनाचा तळठाव घेण्याचा केलेला प्रयत्न लक्षणीय आहे.

९) पिंपळाचे हृदगत: (१२-२-१९३५): या कथेत लक्ष्मणराव सरदेसाईंनी फँटसीचा वापर केलेला असून भग्न इनामदार वाड्यासमोरचा पिंपळ त्या वाड्याचा इतिहास निवेदकाला कथन करत कसल्याचे चित्रण केलेले आहे. फँटसी तंत्राचा चपखल वापर या कथेत ते करतात. आशय आणि अभिव्यक्ती यांचा सुमेळ त्यातून त्यानी साधलेला आहे. पुढे फँटसी हा तंत्रप्रकार प्रा. गाडगीळांनी आपल्या कथेतून विपुलतेने हाताळलेला पहावयास मिळतो.

१०) मृगजल (०४-३-१९३५): या कथेचे स्वरूप एखाद्या ललित निबंधासारखे असून ती नवकथेशी नाते सांगणारी वाटते. एकीकडे श्रीमंत देवालयांपासून संपत्ती कुजते आहे तर दुसरीकडे गरजू विद्यार्थी व जनता पैशाअभावी विद्यावंचित व अन्नपाण्याविना तळमळताहेत हे दाहक वास्तवदर्शन या कथेतून वाचकांना घडविले असून अशा प्रकारचा हा संपत्तीचा अपव्यय थांबवायला हवा. असे अखेरीला सूचित केलेले आहे. मानवीजीवनाच्या व समाजजीवनाच्या विविध अंगानी केलेले चिंतन या कथेतून जाणवते. 'मृगजल' या कथाशीर्षकातून मोक्षाच्या मृगजलामागे धावणाऱ्या लोकांकडून मानवतेकडे कसे दुर्लक्ष होते, हे सूचित केले आहे.

११) मायेचा वारसा: प्रा. सरदेसाईंची ही कथा नवकथेनंतरच्या देशीवादी प्रवृत्तीशी नातेसंबंध सांगणारी आहे. तसेच या कथेला कथानक असे फारसे नाहीच असे म्हटले तर ते वावगे होणारे नाही. परंपरागत पात्रचित्रणाचे तंत्र त्यांनी या कथेत नाकारलेले असून तद्विषयीचा नवा दृष्टिकोन त्यातून व्यक्त होतो.

१२) भाग्यवंत: उपरोक्त कथेप्रमाणेच ही कथाही देशीवादी प्रवृत्तीशी नातेसंबंध सांगणारी कथा आहे. या कथेतूनही व्यक्तिचित्रणाचा नवा दृष्टिकोन आणि रूढ कथानकापेक्षा लवचिक अशा कथानक वाचकांना ते प्रत्यय आणून देतात.

१३) मेणाची बाहुली: ही कथाही देशीवादाशी नातेसंबंध सांगणारी कथा आहे. या कथेतही त्यांनी फँटसी तंत्राचा वापर केलेला असून कथेच्या अंतर्घाटाच्या बरोबरीने बहिर्घाटात केलेला बदल लक्षवेधक ठरतो.

१४) अपूर्णतेतील सुख: १९४४ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'आनीतेचे दिव्य' या संग्रहातील ही कथा आहे. फार समर्पक असा फँटसी तंत्राचा वापर संज्ञाप्रवाही चित्रणाकरता त्यांनी या कथेतून केलेला आहे.

भाषा या घटकाचाही या कथांमधील वापर लक्षवेधक आहे. ती केवळ वर्णनात्मक न राहता संस्कारक्षम बनलेली आहे. या दृष्टीने या कथांमधील भाषा पुढील नवकथेच्या भाषेशी साधर्म्य दाखविणारी ठरते.

उपरोक्त कथांमधून प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या कथेतील नवकथेची प्रसादचिन्हे व्यासंगी वाचकाला जाणवल्याशिवाय निश्चितपणे रहाणार नाहीत. परंतु त्यांच्या सुट्यासुट्या कथांतून नवकथेची अवघी वैशिष्ट्ये एकत्रितपणे अपेक्षिणे योग्य होणार नाही. त्याच्या लेखन काळाचा विचार करता युगप्रवृत्तीला सामोरे जात असतानाच त्याना तिला हुलकावणी देऊन मारलेली ही मजल खरोखरच अभिमानास्पद व एक श्रेष्ठ कथाकार म्हणून त्यांच्या लौकिकात भर घालणारी अशीच आहे; असेच म्हणावे लागेल.

शेवटी दिलीप चित्रे म्हणतात त्या प्रमाणे, ''जगातल्या कोणाही प्रतिभावंताचा पिंड इतर कोणासारखाच नसतो.

त्याची कृती त्याच्या स्वत:च्या अस्तित्वभानातून घडलेली असते आणि ती पूर्वीच्या किंवा नंतरच्या कोणाच्याही कृतीपेक्षा कायम वेगळी रहणार असते. साहित्यात मागे-पुढे असा फरक नसतो तर आत्मभानाच्या उंचीचा आणि अस्तित्वभानाच्या गुणवत्तेचा फरक असतो.'' हेच खरे ठरते.

शिवाय नवकथाकार अरविंद गोखले यांनी नवकथेच्या संदर्भात बोलताना नवकथेलाही तिची अशी परंपरा आहे असे सुचविले आहे. या परंपरेचा शोध घेतला तर निश्चितपणे त्यातला एक टप्पा म्हणून प्रा. लक्ष्मणराव सरदेसाईंच्या उपरोक्त कथांचा विचार करावाच लागेल असा विश्वास वाटतो.

❖ ❖ ❖



## डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये

**जन्म ११ डिसेंबर १९०९ मृत्यू १९ ऑक्टोबर २००२**

मराठी भाषा आणि साहित्य यांचे अध्ययन, अध्यापन व संशोधन या क्षेत्रात डॉ. ग्रामोपाध्ये यांनी भरीव कार्य केलेले आहे. मराठीचे नामवंत प्राध्यापक म्हणून ग्रामोपाध्यांची प्रतिमा आहे. सुजाण व समतोल वृत्तीचे समीक्षक ही त्यांची खासियत आहे.

ग्रामोपाध्यांचे मूळ घराणे अक्कलकोटचे. अक्कलकोट येथे त्यांचा जन्म इ. स. १९०९ मध्ये झाला. त्यांचे उच्च शिक्षण पुणे येथे झाले. खडतर परिस्थितीशी झगडतच त्यांनी मुंबई विद्यापीठाची पीएच. डी मिळवली.

पुणे येथील भावे विद्यालयात त्यांनी शिक्षकी पेशास आरंभ केला. (१९३४-१९४३) त्यानंतर एम्. ए. (१९३७) व पीएच. डी. (१९४१) या पदव्या संपादन केल्या. बेळगांव येथील लिंगराज महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून काम केले. (१९४३-१९५१) पुढे मुंबई येथील खालसा महाविद्यालयात दहा वर्षे (१९५१-१९६१) व विल्सन महाविद्यालयात नऊ वर्षे (१९६१-१९७०) प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून काम केले. तेथून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी पणजी (गोवा) येथील मुंबई विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यास व संशोधन केंद्रात प्रपाठक म्हणून आठ वर्षे (१९७०-१९७८) कार्य केले. ४४ वर्षे मराठीचे अध्यापन करण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्यांच्या गोव्यातील वास्तव्याचा लाभ नवमुक्त गोव्याच्या नव्या पिढीला भरपूर प्रमाणात मिळाला. अध्यापन हे त्यांचे केंद्र होते. लेखन, वाचन, चिंतन, मनन हा त्यांच्या आयुष्याचा निदिध्यास होता. पीएच. डी.च्या विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. गोव्यात दरवर्षी वाङ्मयीन चर्चासत्रांचे संयोजन करून विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना चिकित्सक निबंधलेखनाची व मुक्त वाङ्मयीन चर्चेची गोडी त्यांनी लावली.

'पेशवे दप्तरातील मराठी भाषेचे स्वरूप' ह्या विषयावर त्यांनी पीएच. डी संपादन केली. 'मराठी बखर वाङ्मयाचा पुनर्विचार' हा त्याचा ग्रंथ मौलिक व वेगळी वाट अनुसरणारा आहे. 'भाषाविचार आणि मराठी भाषा' या ग्रंथातील स्फोटासिद्धान्तही विचारप्रवर्तक मानला जातो. संतकाव्य समालोचन, वाङ्मयीन मूल्ये आणि जीवनमूल्ये, वाङ्मयविचार, आख्यानक कविता इ. त्यांचे समीक्षाग्रंथही उपयुक्त स्वरूपाचे आहेत.

गोमंतक मराठी अकादमीचे ते सदस्य होते. त्यांनी आपला अमूल्य ग्रंथसंग्रह गोमंतक मराठी अकादमीच्या सुपूर्द केला आहे. गोमंतक साहित्यसेवक मंडळाशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांचा समीक्षाविषयक दृष्टिकोण नेहमीच स्वागतशील व मनमोकळा राहिला. त्यांनी नव्या पिढीशी सातत्याने संवाद साधला.

निरंतन ग्रंथसहवासामध्ये मग्न असलेल्या या ज्ञानोपासकाचे नाव ग्रंथदालनाला देऊन रौप्यमहोत्सवी साहित्य संमेलन त्यांचे उचित स्मरण करीत आहे.

**-संपादक**